सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीचे वितरण करणे बाबत. लेखाशिर्ष (२२३५ ३०३२) (२२३५ ३०४१)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी- २०१८/प्र.क्र.९८/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १८ एप्रिल, २०१८.

संदर्भ: १. वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८

प्रस्तावना :

सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाच्या प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर, २०१८ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० टक्केच्या मर्यादेत वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. ०२.०४.२०१७ च्या परिपत्रकानुसार वितरणासाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

२. बाल न्याय अधिनियमान्वये शासन प्रमाणित गृहे व सुधारगृहे यांचे परिरक्षण करणे या अंतर्गत (१) शासकीय कोर्ट कमिटेड अपंग मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह उल्हासनगर - ५ जि. ठाणे, (२) शासकीय मुलांचे निरीक्षणगृह/विशेषगृह शांतीभवन कॅम्प, उल्हासनगर-५ जि. ठाणे, (३) शासकीय अस्थिव्यंग मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, चंद्रपूर, या शासकीय संस्थांकरिता लेखाशीर्ष (२२३५ ३०३२) आणि संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांनी सहायक अनुदान , लेखाशिर्ष (२२३५३०४१) या लेखाशीर्षाखालील अनिवार्य तरतूदी अंतर्गत अर्थसंकल्पित निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत निधी नियंत्रक अधिका-यांच्या सूपुर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

शासन निर्णय :-

१. आता या शासन निर्णयान्वये उपरोक्त शासकीय बालगृह/सुधारगृहातील कर्मचा-यांचे वेतन व इतर अनुषंगिक बाबींसाठी व संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (वेतन) यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी खालील लेखाशिषांतर्गत तरतूदी वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	योजना व लेखाशिर्ष व उद्दिष्ट्य	सन २०१८-१९ अर्थसंकल्पित तरतूद(रू. लक्ष)	वितरित करण्यात येत असलेली तरतूद ७० टक्के (रू .लक्ष)
१	मागणी क्रमांक एक्स ०१- २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०२, बाल कल्याण, (०१) बालक समृद्धी योजना (०१) (०४)बाल न्याय अधिनियमान्वये शासन प्रमाणित गृहे व सुधारगृहे यांचे परिरक्षण करणे (२२३५ ३०३२)		
	०१, वेतन	२०४३.१०	२९१.९७
	०६, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क	५.०१	३.५०
	११, देशांतर्गत प्रवास खर्च	१.१८	०.८२
	१३, कार्यालयीन खर्च	१.४७	१.०२
	१४, भाडे पट्टी व कर	११.००	७.७०
	१९, आहार खर्च	२१.८२	१५.२७
	२१, पुरवठा सामग्री	४.०७	२.८४
	५०, इतर खर्च	१.६८	१.१७
	एकूण	**२०८९.३३**	**३२४.२९**
२	मागणी क्रमांक एक्स ,०१- २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, स्वयंसेवी संस्थांना अनुदान १०२, बाल कल्याण, (०२)(०३)संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांनी सहायक अनुदान (२२३५३०४१) , ३६सहायक अनुदान(वेतन)	७८०.०६	५४६.०४

२. सदर निधी वितरणाकरिता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संदर्भाधीन वित्त विभाग परिपत्रकातील परि. क्र. ७ १ (आ) मध्ये नमुद सूचनेनुसार शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थांच्या बँक खात्यात अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पद्धतीन वितरित करण्यात येऊ नये.

३. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदींपेक्षा त्या-त्या शीर्षाखाली अधिकचा खर्च होणार नाही याची काळजी नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. या रकमा खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली व या विभागाच्या तसेच वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकातील सर्व अटी /शर्तीचे पालन करण्यात यावे.

४. हा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०४१८१६४६४२४४३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.04.18 16:47:23 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१०) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
११) प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१३) उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे.
१५) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१६) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१७) संचालक,लेखा व कोषागरे संचालनालय,म.रा.मुंबई
१८) संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई

१९) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

२०) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.

२१) वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय,मुंबई -३२,

२२) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

२३) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

२४) निवड नस्ती का-८